सकाळ
सोलापूर, शनिवार, २५ जुलै २०१५



सोलापूर : किर्लोस्कर वसुंधरा महोत्सवामध्ये शुक्रवारी सायंकाळी वसुंधरा मित्र पुरस्काराच्या वितरण प्रसंगी डॉ. एस. पी. वैद्य, संयोजक वीरेंद्र चित्राव, एस. गायकवाड, एच. आर. देसाई, डॉ. आनंद कर्वे. पुरस्कारार्थी 'सकाळ'चे उपसंपादक रजनीश जोशी, अशोक पाटील, विनय व श्रुताली नारकर.

# जैव कचऱ्याची मुख्य समस्या

## डॉ. आनंद कर्वे : वसुंधरा मित्र पुरस्काराचे वितरण

**सकाळ वृत्तसेवा**

सोलापूर, ता. २४ : वैयक्तिक पातळीवर कचरा व्यवस्थापन करता येते. कचऱ्यातील कापड, काचा, धातू, प्लास्टिक, कागद वेगळा करावा. या वस्तूंची विक्रीही करता येते. देशापुढे सध्या जैव कचऱ्याची मुख्य समस्या आहे. जैव कचऱ्याची विल्हेवाट लावल्यास देशातील कचऱ्याची समस्या मोठ्या प्रमाणात दूर होईल, असा विश्वास डॉ. आनंद कर्वे यांनी व्यक्त केला.

किर्लोस्कर वसुंधरा महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी ते बोलत होते. शहरी घनकचरा व्यवस्थापन या विषयावर त्यांनी व्याख्यान दिले. तत्पूर्वी डॉ. कर्वे यांच्या हस्ते वसुंधरा मित्र पुरस्काराचे वितरण करण्यात आले. वसुंधरा मित्र पुरस्काराने यंदा 'सकाळ'चे उपसंपादक रजनीश जोशी, अशोक पाटील, विनय व श्रुताली नारकर यांना सन्मानित करण्यात आले. या वेळी डॉ. एस. पी. वैद्य, संयोजक वीरेंद्र चित्राव, एस. गायकवाड, अल्ट्राटेकचे एच. आर. देसाई, सहसमन्वयक प्रा. नरेंद्र काटीकर उपस्थित होते.

सकाळी आठ वाजता पोलिस अधिकारी रवी गोडसे यांच्या हस्ते वृक्षाला पाणी घालून व पुण्यश्लोक अहिल्यादेवी आणि हुतात्म्यांना पुष्पहार अर्पण करून रॅलीला सुरवात झाली. नूतन प्रशाला, दमाणी हायस्कूल, श्राविका हायस्कूल, जैन गुरुकुल हायस्कूल, सुरवसे हायस्कूल, श्री सिद्धेश्वर प्रशाला, मॉडर्न हायस्कूल, ज्ञान प्रबोधिनी, सिंहगड पब्लिक स्कूल या शाळांनी सहभाग घेतला होता. ढोल, लेझीमच्या गजरात विद्यार्थ्यांनी 'शून्य कचरा रोगराईला विसरा', 'जेव्हा होईल कचऱ्याचा विनाश तेव्हा होईल माणसाचा विकास', 'एक रोप एक झाड', 'जेव्हा कचरा होईल शून्य तेव्हा धरती होईल धन्य' अशा घोषणा देत मुलांनी जनजागृती केली. ज्ञानप्रबोधिनीच्या विद्यार्थ्यांनी टिपऱ्याचा उत्कृष्ट देखावा तर मॉडर्न हायस्कूलने स्वच्छतेचा संदेश दिला. सिंहगड पब्लिक स्कूलने आधुनिक गाडगेबाबांच्या माध्यमातून स्वच्छतेचा संदेश दिला. डॉ. फडकुले सभागृहाजवळ रॅलीचा समारोप झाला.

### पर्यावरण चित्रात रमले विद्यार्थी

**डॉ. फडकुले सभागृहाच्या प्रांगणात चित्रकला स्पर्धा झाली. विद्यार्थ्यांनी 'शून्य कचरा' विषयावर चित्र काढले. चित्र काढण्यासाठी एक तासाचा अवधी देण्यात आला होता. पर्यावरण छायाचित्राचे उद्‍घाटन विश्वजित नाईक यांच्या हस्ते झाले. छायाचित्रात नवीन दृष्टिकोन, जिवंतपणा असावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. या सभागृहात चार विविध दालनांत पशू, पक्षी, पर्यावरण, फुले, शून्य कचरा यांची छायाचित्रे लावलेली आहेत.**